मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रेसनोट

- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी

दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता, अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दिपक खांबित, पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच, भाईंदर पश्चिम येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती स्मारक, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास आणि मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५व्या जयंतीचे औचित्य साधत घोडबंदर रोड ते घोडबंदर किल्ला याठिकाणी शासनाच्या "जय शिवाजी, जय भारत" पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत स्थानिक लोकप्रतिनिधी, शालेय विद्यार्थी, विविध सामाजिक व सांस्कृतिक संघटनांचे कार्यकर्ते, महापालिका प्रशासनाचे अधिकारी आणि हजारो स्वराज्यप्रेमी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. पदयात्रेदरम्यान शिवगर्जना, पारंपरिक ढोल-ताशा पथकांच्या तालावर वातावरण शिवमय झाले. छत्रपती शिवरायांचा जयघोष करत सहभागी नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेची आठवण करून दिली.

घोडबंदर किल्ल्यावर पोहोचताच शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या प्रमुख मान्यवरांनी भाषणे केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रणनिती, प्रशासन व्यवस्थापन आणि रयत राजकारणाचा प्रभाव याविषयी तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. शिवरायांच्या शौर्यगाथेवर शालेय विद्यार्थ्यांनी नृत्य, पोवाडे गायन यावेळी सादर केले. इतिहास अभ्यासकांनी घोडबंदर किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि त्याच्या स्वराज्यातील भूमिका स्पष्ट केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन समाजासाठी भरीव कार्य करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक आणि ज्येष्ठ नागरिकांचा महापालिकेच्या वतीने विशेष प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली आणि त्यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यानिमित्ताने करण्यात आला. युवा पिढीने शिवरायांच्या नेतृत्वगुणांमधून प्रेरणा घेऊन समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करावे, असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले.